सारणीशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
आतील बाजूस लावला आहे.

## विभाग - ब

मुख्याध्यापक प्रश्नावलीच्या पहिल्या भागात मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीच्या संदर्भात प्रश्न विचारले आहेत. (प्रश्न क्रमांक १) पूर्ण नांव, (प्रश्न क्रमांक २) शैक्षणिक अर्हता, (प्रश्न क्रमांक ३) व्यावसायिक अर्हता, (प्रश्न क्रमांक ४) मुख्याध्यापक पदाचा अनुभव, (प्रश्न क्रमांक ५) विद्यालयाचे नांव व पत्ता. प्रश्नावलीतील या प्रश्नांच्या आधारे प्राप्त माहिती येथे दिलेली असून हे प्रश्न मुख्याध्यापकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात. शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संस्थेतील माध्यमिक विद्यालयामध्ये कार्य करणाऱ्या मुख्याध्यापकांची यादी 'परिशिष्ट ई' मध्ये दिलेली आहे.

खालील सारणी क्रमांक ५.३९ मध्ये माध्यमिक विद्यालयातील प्रतिसादक मुख्याध्यापकाकडून भरून आलेल्या प्रश्नावलींच्या आधारे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दाखविली आहे.

## ५..०६ मुख्याध्यापक वैयक्तिक माहितीचे विश्लेषण व विशदीकरण

### सारणी क्रमांक - ५.३९
### मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता.

| अनुक्रमांक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बी. ए. बी. एड. | १४ | ५६ |
| २ | बी. एस्सी. बी. एड. | ०४ | १६ |
| ३ | एम. ए. बी. एड. | ०३ | १२ |
| ४ | एम. ए. एम. एड. | ०२ | ०८ |
| ५ | बी. ए. बी. पी. एड. | ०२ | ०८ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.३९ वरून असे निदर्शनास येते की, ५६ टक्के मुख्याध्यापक हे बी. ए. बी. एड. आहेत. सोळा टक्के मुख्याध्यापक हे बी. एस्सी. बी. एड. आहेत. बारा टक्के मख्याध्यापक हे एम. ए. बी. एड. आहेत. आठ टक्के मुख्याध्यापक हे एम. ए. एम. एड. आहेत. आठ टक्के मुख्याध्यापक हे बी. ए. बी. पी. एड. आहेत.

माध्यमिक शाळा संहितेनुसार मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता योग्य आहे असे वरील सारणी वरून लक्षात येते. ही बाब संशोधनाच्या दृष्टिने समाधानकारक आहे.

मुख्याध्यापक पदाचा अनुभव सारणी क्रमांक ५.४० मध्ये दिलेला आहे.

## सारणी क्रमांक ५.४०


## मुख्याध्यापकांच्या एकूण अनुभवांची सरासरी.

| अनुक्रमांक | अनुभवांचे वर्गांतर | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | ३१ - ३५ | १ |
| २ | २६ - ३० | ० |
| ३ | २१ - २५ | १ |
| ४ | १६ - २० | २ |
| ५ | ११ - १५ | १ |
| ६ | ६ - १० | ४ |
| ७ | १ - ५ | १६ |
| | | २५ |

वरील सारणी क्रमांक ५.४० वरून असे निदर्शनास येते की, मुख्याध्यापकांच्या अनुभवांचे मध्यमान हे ८.२२ म्हणजेच ८ वर्ष इतके आहे. हे मध्यमान गृहित मध्यमान पद्धतीनुसार काढले आहे.

मुख्याध्यापक होण्यासाठी माध्यमिक स्तरावर अध्यापनाचा किमान पाच वर्ष अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे मुख्याध्यापकांच्या अनुभवाची सरासरी ८ + ५ = १३ वर्षे इतकी येते मूल्यशिक्षणाची कार्यवाही माध्यमिक स्तरावर करण्यास हा गट सक्षम आहे.

## आलेख क्रमांक ५.१४
## संस्थेतील २५ शाळांमधील मुला मुलींचे प्रमाण



## विद्यालयाची सर्वसाधारण माहिती

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ६, ७, व ८ हे प्रश्न विद्यालयाच्या सर्वसाधारण माहिती मिळविण्याच्या उद्देशाने विचारले होते त्यावरून शिक्षक संख्या, एकूण तुकड्यांची संख्या, एकूण विद्यार्थी संख्या स्पष्ट होणार आहे.

सारणी क्रमांक - ५.४१ मध्ये विद्यालयांची सर्वसाधारण माहिती दिली आहे.

## सारणी क्रमांक - ५.४१

## विद्यालयांची सर्वसाधारण माहिती

| अ. क्र. | विद्यालयाचे नांव | एकूण शिक्षक | एकूण तुकड्या | मुलांची संख्या | मुलींची संख्या | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सदाशिवराव माने विद्यालय अकलूज | १६३ | ७६ | ३००५ | १४९८ | ४५०३ |
| २ | महर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रशाला शंकरनगर | ४५ | २३ | १५५० | १२८९ | २६१ |
| ३ | कन्या प्रशाला शंकरनगर | १७ | ११ | ---- | ६०३ | ६०३ |
| ४ | कृष्णानंद विद्यामंदीर पाटील वस्ती | १८ | १२ | ३८९ | २२५ | ६१४ |
| ५ | सादाशिवराव माने विद्यालय माणकी | १८ | १२ | २०१ | ३३२ | ५३३ |
| ६ | मोरोची विद्यालय मोरोची | ३२ | १४ | ४६६ | ३३० | ७९६ |
| ७ | कन्या प्रशाला अकलूज | १४ | ०९ | ---- | ६३० | ६३० |
| ८ | श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील कन्या प्रशाला नातेपुते | ०८ | ०६ | ---- | २८० | २८० |
| ९ | श्रीगणेश विद्यालय पिंपळनेर | १८ | ११ | ४१७ | २५१ | ६६८ |
| १० | प्रतापसिंह मोहिते पाटील विद्यालय शिवपूरी | १३ | ०८ | २४८ | १७८ | ४२६ |
| ११ | माध्यमिक विद्यालय गुरसाळे | ०७ | ०५ | ९४ | ९६ | १९० |
| १२ | श्री विजयसिंह मोहिते विद्यालय वाघोली | १४ | ०९ | २१८ | १०४ | ३२२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय विजोरी | ०९ | ०६ | १८२ | १०८ | २९० |
| १४ | माध्यमिक विद्यालय चाकोरे | ०५ | ०३ | ६६ | ३८ | १०४ |
| १५ | मोहनराव पाटील विद्यालय बोरगांव | ०८ | ०६ | १७३ | ८६ | २५९ |
| १६ | श्री. जयसिह मोहिते पाटील विद्यालय गारवाड | ०५ | ०३ | ८४ | १९ | १०३ |
| १७ | माध्यमिक विद्यालय पळसमंडळ | ०५ | ०३ | ४३ | २४ | ६७ |
| १८ | श्री. विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय कोळेगांव | ०६ | ०४ | ८८ | ६० | १४८ |
| १९ | माध्यमिक विद्यालय बोंडले | ०८ | ०६ | १७८ | १२८ | ३०६ |
| २० | माध्यमिक विद्यालय उंबरे दहीगांव | ०४ | ०३ | ७७ | ३७ | ११४ |
| २१ | श्री. बाणलिंग विद्यालय फोंडशिरस | २१ | १३ | ५२० | ३४८ | ८६८ |
| २२ | रामलिंग विद्यालय कुरबावी | ०९ | ०६ | ११२ | ९४ | २०६ |
| २३ | श्रीमती. रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला मांडवे | १३ | ०६ | २७४ | १०७ | ३८१ |
| २४ | सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर | १२ | ०७ | ४११ | २३७ | ६४८ |
| २५ | माध्यमिक विद्यालय लवंग | ०९ | ०६ | २११ | १६६ | ३७७ |
| | एकूण | ४८१ | २६४ | ९००७ | ७२६८ | १६२७५ |
| | शेकडा प्रमाण | | | ५५.३४ | ४४.६६ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४१ वरून असे निदर्शनास येते की, माध्यमिक शाळा संहितेनुसार तुकड्यांचे व शिक्षकांचे प्रमाण योग्य आहे. एका तुकडीला १.५ शिक्षक असा कार्यभार आहे त्याप्रमाणे प्रत्येक शाळांमध्ये शिक्षक कार्य करतांना दिसून येते.

पंचेवीस शाळांमध्ये एकूण विद्यार्थी संख्या ही १६२७५ एवढी आहे. त्यांमध्ये मुलांचे शेकडा प्रमाण ५५.३४ टक्के व मुलींचे शेकडा प्रमाण ४५.६६ टक्के एवढे आहे. दोन्ही प्रमाणांचा विचार करता हे प्रमाण योग्य आहे. तसेच २५ शाळांपैकी ३ शाळा खास मुलींच्या करिता चालविल्या जातात त्यावरून संस्थेने

मुलींच्या शिक्षणाची खास सोय केल्याचे दिसून येते. इतर शाळांमध्ये सुद्धा मुलींचे व मुलांचे प्रमाण हे योग्य आहे. ही बाब समाधानकारक आहे असे संशोधकास वाटते.

## ५.०७ मूल्यशिक्षणांच्या नियोजनाबाबतचे वर्गीकरण -

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ९ ते २० हे प्रश्न मूल्यशिक्षण नियोजनबाबत विचारले होते, त्यामध्ये मुक्त प्रश्न ५ व बद्ध प्रश्न ३ होते. मूल्यशिक्षण कार्यवाही सूत्रबद्ध घडवून आणण्यासाठी हे प्रश्न संशोधकाने विचारले होते त्यांचे वर्गीकरण पुढील सारणीमध्ये केले आहे.

### सारणी क्रमांक ५.४२

### वेळापत्रकातील मूल्यशिक्षणाच्या प्रथम तासिके बाबत प्रतिसाद

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४२ वरून असे निदर्शनास येत् की २५ पैकी २५ मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षणाची प्रथम तासिका योग्य वाटते. प्रथम तासिका योग्य वाटण्याची कारणे कोणती ते सारणी क्रमांक ५.४३ मध्ये दिली आहेत.

## सारणी क्रमांक ५.४३

## मूल्यशिक्षण प्रथम तासिका योग्य वाटण्याची कारणे

| अनुक्रमांक | कारणांचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी प्रसन्न असतात. | ६ | २४ |
| २ | दिवसाची सुरूवात चांगल्या विचाराने होते. | ८ | ३२ |
| ३ | वातावरण निर्मिती होते. | ५ | २० |
| ४ | अध्ययन प्रक्रियेशी सांगड घालता येते. | ५ | २० |
| ५ | वेळ अपुरा आहे म्हणून | १ | ०४ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४३ वरून असे निदर्शनास येते की, २४ टक्के मुख्याध्यापकांना सुरूवातीस विद्यार्थ्यांचे मन प्रसन्न असते असे वाटते. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना दिवसाची सुरूवात चांगल्या विचाराने होते असे वाटते. वीस टक्के मुख्याध्यापकांना वातावरन निर्मिती व अध्ययन प्रक्रयेशी सांगड घालता येते असे वाटते. चार टक्के मुख्याद्यापकांना शासनाने ३० मिनीट वेळ मुख्यशिक्षणाला दिल्यामुळे प्रथम तासिका योग्य वाटते.

विद्यार्थी प्रसन्न असतात असा प्रतिसाद २४ टक्के मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे. सुरूवातीला मुले कोणत्याही अभ्यासक्रमातील विषयाच्या दबावाखाली नसल्यामुळे हे कारण योग्य आहे.

दिवसाची सुरूवात चांगल्या विचाराने होते असा प्रतिसाद ३२ टक्के मुख्याध्यापकांनी दिला आहे. शालेय परिपाठाच्या वेगवेगळ्या उपक्रमांच्या आधारे विद्यार्थ्यांना मूल्यांची जाणीव जागृती करण्यास सुरूवातीची तासिका योग्य आहे.

वेळ अपुरा आहे म्हणून सुरूवातीची तासिका योग्य वाटते असा प्रतिसाद ४ टक्के मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे. हे कारण संशोधकास योग्य वाटत नाही कारण संपूर्ण वर्षभर शाळा व शिक्षक यांच्या समवेत विद्यार्थी असतो असे संशोधकास वाटते.

## सारणी क्रमांक ५.४४

## मूल्यशिक्षण वार्षिक नियोजनाबाबतचा प्रतिसाद

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४४ वरून असे निदर्शनास येते की, १०० टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी त्याचे वार्षिक नियोजन करण्याची आवश्यकता वर्षारंभी करावी असे वाटते.

कोणत्याही गोष्टीचे नियोजन सुरूवातीला केल्यामुळे त्या विषयाची व्याप्ती समजते. वार्षिक नियोजन केल्यामुळे संभाव्य अडचणी दूर करता येतात व त्याचा फायदा उपक्रमामध्ये नाविन्य निर्माण करण्यास होतो. १०० टक्के मुख्याध्यापकांच्या प्रतिसादावरून हे नियोजन वर्षारंभी करणे अधिक योग्य आहे.

## सारणी क्रमांक - ५.४५

## मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन करणाऱ्या विद्यालयांचे शेकडा प्रमाण

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | १०० |
| २ | नाही | ० | ० |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४५ वरून असे निदर्शनास येते की, १०० टक्के शाळांमधील मुख्याध्यापक मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी मूल्यशिक्षणाचे नियोजन वर्षारंभी करतात ही बाब अत्यंत समाधानकारक आहे.

मूल्यशिक्षण वार्षिक नियोजनाचे काम कोण करते ते सारणी क्रमांक ५.४६ मध्ये दिले आहे.

## सारणी क्रमांक - ५.४६

## मूल्यशिक्षण वार्षिक नियोजन करणाऱ्या व्यक्ती

| अनुक्रमांक | नियोजन करणाऱ्या व्यक्ती | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक | ३ | १२ |
| २ | उपमुख्याध्यापक | -- | -- |
| ३ | पर्यवेक्षक | -- | -- |
| ४ | सहशिक्षक | ५ | २० |
| ५ | सर्वजण चर्चा करून | १७ | ६८ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४६ वरून असे निदर्शनास येते की, १२ टक्के मुख्याध्यापक हे स्वतः मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन करतात. वीस टक्के सहशिक्षक हे वार्षिक नियोजन करतात असे दिसून येतो. अडुसष्ठ टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापकांपासून ते सहशिक्षकांपर्यंत सर्वांशी चर्चा करून वार्षिक नियोजन केले जाते.

बारा टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापक स्वतः वार्षिक नियोजन करतात तर ६८ टक्के शाळांमध्ये सर्वजन चर्चा करून वार्षिक नियोजन करतात. सर्व जन चर्चा करून वार्षिक नियोजन केल्यास योग्य चर्चा होण्याची शक्यता अधिक असते त्यामुळे नवनिर्मायक विचाराला चालना मिळते, त्यामुळे सर्वांनी चर्चा करून नियोजन करणे अधिक संयुक्तीक वाटते.

## सारणी क्रमांक - ५.४७

## मूल्यशिक्षणासाठी वार्षिक नियोजन करताना जाणवणाऱ्या त्रुटीचे स्वरूप.

| अनुक्रमांक | त्रूटीचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वेळ अपुरा वाटतो. | ५ | २० |
| २ | साहित्य अपुरे आहे. | ७ | २८ |
| ३ | निश्चित अभ्यासक्रम नाही. | २ | ०८ |
| ४ | प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण कमी | ८ | ३२ |
| ५ | अचूक मूल्यमापण करताना | ३ | १२ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४७ वरून असे निदर्शनास येते की, २० टक्के मुख्याध्यापकांना नियोजन करताना वेळ अपूरा आहे असे वाटते. अठ्ठावीस टक्के मुख्याध्यापकांना साहित्य अपूरे आहे असे वाटते. आठ टक्के मुख्याध्यापकांना मुल्यशिक्षणाचा अभ्यासक्रम नाही असे वाटते. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना नियोजन करतांना अचूकपणा येत नाही असे वाटते.

वार्षिक नियोजन करत असताना वेळ अपुरा वाटतो असो २० टक्के मुख्याध्यापकांना वाटते पण जर वर्षभराच्या उपक्रमांचे सुव्यवस्थीतपणे नियोजन केल्यास व उपक्रमांचा साचेबंदपणा टाळल्यास वेळ अपूरा वाटणार नाही.

साहित्य अपुरे आहे असे २८ टक्के मुख्याध्यापकांना वाटते यासाठी संस्थेकडे योग्य वेळी मागणी केल्यास साहित्याची अडचण सहज सुटू शकेल. प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण कमी असा प्रतिसाद ३२ टक्के मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे. प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण वाढविण्यासाठी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन संस्था पातळीवर घेणे आवश्यक आहे.

## सारणी क्रमांक - ५.४८

## मूल्यशिक्षण नियोजन करताना येणाऱ्या अडचणीवरती उपाययोजना

| अनुक्रमांक | उपाययोजनांचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी गट पाडणे | ६ | २४ |
| २ | शाळेच्या वेले व्यतिरीक्त जादा वेळ देणे | ८ | ३२ |
| ३ | सामुहिक कार्यक्रमांचे आयोजन करणे | ४ | १६ |
| ४ | प्रशिक्षित शिक्षकांनी इतरांना माहिती देणे | ७ | २८ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४८ वरून असे निदर्शनास येते की, २४ टक्के मुख्याध्यापक नियोजन करताना विद्यार्थ्यांचे गट पाडतात. बत्तीस टक्के मुख्याध्यापक शाळेच्या वेळा व्यतिरीक्त वेळ देतात. सोळा

टक्के मुख्याध्यापक सामुहिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. अठ्ठावीस टक्के मुख्याध्यापक प्रशिक्षित शिक्षकांकडून इतर शिक्षकांना उपक्रमाचे स्वरूप समजावून देतात.

मूल्यशिक्षणाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी विद्यार्थी गट पाडणे यासाठी २४ टक्के मुख्याध्यापकांनी प्रतिसाद नोंदविला आहे. अशाप्रकारे गट पाडल्यास त्याचा उपयोग उपक्रम राबविताना शिक्षकांना वर्षभर होऊ शकतो, शाळेच्या वेळाव्यतिरीक्त जादा वेळ देवून उपक्रम राबविले जातात असा प्रतिसाद ३२ टक्के मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे ही बाब संशोधनाच्या दृष्टिने अत्यंत समाधानकारक आहे. प्रशिक्षित शिक्षकांनी इतरांना माहिती देणे यासाठी २८ टक्के मुख्याध्यापकांनी प्रतिसाद नोंदविला आहे. प्रशिक्षित शिक्षकांनी इतरांना माहिती देण्याचे प्रमाण वाढले पाहिजे कारण सर्व शिक्षकांना एकाच वेळी प्रशिक्षण देणे शक्य नाही.

## सारणी क्रमांक - ५.४९

## मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असताना शिक्षकांना प्रशिक्षण देणे बाबत

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २४ | ९६ |
| २ | नाही | १ | ४ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.४९ वरून असे निदर्शनास येते की, ९६ टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षण कार्यवाहीसाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे असे वाटते. चार टक्के मुख्याध्यापकांना त्याची आवश्यकता वाटत नाही.

मूल्यशिक्षण ही संकल्पना फार पूर्वीपासून अभ्यासक्रमात आहे. आजच्या परिस्थितीमध्ये मूल्यशिक्षणाचा नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. शासनाने मुल्यशिक्षणासाठी नवनवीन उपक्रम ठरवून दिले आहेत त्यामुळे शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

ज्या ९६ टक्के मुख्याध्यापकांना प्रशिक्षणाची आवश्यकता वाटते त्या मुख्याध्यापकांना कोणामार्फत शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे त्याचा प्रतिसाद सारणी क्रमांक ५.५० मध्येदिला आहे.

## सारणी क्रमांक - ५.५०

## मूल्यशिक्षण प्रशिक्षण कोणत्या संस्थांनी दिले पाहिजे याबद्दलचा मुख्याध्यापकांचा प्रतिसाद

| अनुक्रमांक | संस्थेचे नांव | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक संस्था | ९ | ३६ |
| २ | सामाजिक संस्था | २ | ८ |
| ३ | शासन | २१ | ८४ |
| ४ | मुख्याध्यापक संघ | ३ | १२ |
| ५ | शिक्षक संघ | १ | ४ |

वरील सारणी क्रमांक ५.५० वरून असे निदर्शनास येते की, ३६ टक्के मुख्याध्यापकांना शैक्षणिक संस्थांनी शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण द्यावे असे वाटते. आठ टक्के मुख्याध्यापकांना सामजिक संस्थांनी प्रशिक्षण द्यावे असे वाटते. चौ-याऐंशी टक्के मुख्याध्यापकांना शासनाने प्रशिक्षण द्यावे असे वाटते. चार टक्के मुख्याध्यपकांना शिक्षक संघाने प्रशिक्षण द्यावे असे वाटते.

मूल्यशिक्षणाचे उपक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी व शासनाने अधिक प्रमाणात प्रयत्न करावेत असे मुख्याध्यापकांना वाटत असले तरी सुद्धा संस्था पातळीवर तज्ञ व्यक्ती निवडून असे प्रयत्न केल्यास त्याचा फायदा संस्थेतील अधिक शिक्षकांना होऊ शकतो.

## सारणी क्रमांक - ५.५१

## प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची विद्यालयातील संख्या

| अनुक्रमांक | प्रत्येक शाळेतील शिक्षक | एकूण शिक्षक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक | ३० | ५७ |
| २ | दोन | १३ | २४ |
| ३ | एकही नाही | १० | १९ |
| | | ५३ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५१ वरून असे निदर्शनास येते की, २५ शाळांपैकी ५७ टक्के शाळांमधील प्रत्येकी एक शिक्षकाने प्रशिक्षण पूर्ण केले आहे. चोवीस टक्के शाळांतील प्रत्येकी दोन शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. एकोणीस टक्के शाळांमधील एकही शिक्षकाला प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली नाही.

तीस शिक्षकांना एक दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. पण हे प्रमाण खूपच कमी आहे. व प्रशिक्षणाचा कालावधी सुद्धा खूपच कमी आहे. एकोणीस शाळांमधील एकही शिक्षकाला प्रशिक्षण पूर्ण करता आले नाही ही बाब चिंताजनक आहे, असे संशोधकास वाटते त्यामुळे उपक्रम राबवीत असताना अधिक अडचणी जाणवतात.

## सारणी क्रमांक - ५.५२


## विद्यालयांमध्ये मूल्यशिक्षणाचे राबविले जाणारे उपक्रम

| अनुक्रमांक | उपक्रमाचे स्वरूप | एकूण विद्यालये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दैनंदिन परिपाठ | २५ | १०० |
| २ | व्याख्याने | २३ | ९२ |
| ३ | प्रात्यक्षिक कार्य | १३ | ५२ |

सारणीशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
आतील बाजूस लावला आहे.

आलेख क्रमांक ५.१५

विद्यालयामध्ये मैदानाची उपलब्धता



वरील सारणी क्रमांक ५.५२ वरून असे निदर्शनास येते की, २५ शाळांपैकी १०० टक्के शाळांमध्ये दैनंदिन परिपाठ हा उपक्रम राबवितात. ब्यान्नव टक्के शाळा व्याख्यानाद्वारे मूल्यशिक्षण देतात तर ५२ टक्के शाळांमध्ये मूल्यशिक्षण देण्यासाठी प्रात्यक्षिक कार्याचा अवलंब करतात.

दैनंदिन परिपाठ विद्यालयामध्ये राबविण्याचे प्रमाण १०० टक्के आहे ही बाब संशोधनाच्या दृष्टिने दैनंदिन परिपाठाचे आयोजन महत्वाचे वाटते. प्रात्यक्षिक कार्य घेणाऱ्या शाळांचे प्रमाण ५२ टक्के आहे. याचे प्रमाण वाढविल्यास विद्यार्थ्यांना कृतिद्वारे मूल्यशिक्षण मिळू शकेल व ते दिर्घकाळ स्मरणात राहण्यास मदत होईल असे संशोधकास वाटते.

मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा

या विभागामध्ये एकूण ९ प्रश्न विचारले होते त्यामध्ये ८ प्रश्न हे बद्ध स्वरूपाचे व एक प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. मुल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी कोणकोणत्या भौतिक सुविधा आवश्यक आहेत याचा विचार या विभागात केला आहे.

## ५.०८ मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणा-या भौतिक सुविधा

### सारणी क्रमांक - ५.५३

### विद्यालयामध्ये मैदानाची उपलब्धता


| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २३ | ९२ |
| २ | नाही | २ | ८ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५३ वरून असे निदर्शनास येते की, २५ पैकी २३ शाळांना म्हणजेच ९२ शाळांना पुरेसे मैदान उपलब्ध आहे. आठ टक्के शाळांना पुरेसे मैदान उपलब्ध नाही.


विद्यार्थ्यांचे शरीर व मन सुदृढ होण्यासाठी प्रत्येक शाळांना मैदान असणे आवश्यक आहे. दैनंदिन परिपाठाचे आयोजन व्यवस्थितपणे होण्यासाठी मैदान आवश्यक आहे असे संशोधकास वाटते.

सारणीशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
आतील बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक ५.१६
## विद्यालयामध्ये सभागृहाची उपलब्धता




## आलेख क्रमांक ५.१७
## विद्यालयामध्ये शास्त्र प्रयोग शाळांची उपलब्धता



## सारणी क्रमांक - ५.५४

## विद्यालयामध्ये सभागृहाची उपलब्धता

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २ | ८ |
| २ | नाही | २३ | ९२ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५३ वरून असे निदर्शनास येते की, २५ पैकी २३ शाळांना म्हणजेच ९२ शाळांना पुरेसे मैदान उपलब्ध आहे. आठ टक्के शाळांना पुरेसे मैदान उपलब्ध नाही.

विद्यार्थ्यांचे शरीर व मन सुदृढ होण्यासाठी प्रत्येक शाळांना मैदान असणे आवश्यक आहे. दैनंदिन परिपाठाचे आयोजन व्यवस्थितपणे होण्यासाठी मैदान आवश्यक आहे असे संशोधकास वाटते.

## सारणी क्रमांक - ५.५५

## विद्यालयामध्ये शास्त्र प्रयोग शाळांची उपलब्धता.


| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ८० |
| २ | नाही | ५ | २० |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५५ वरून असे निदर्शनास येते की, ८० टक्के शाळांना शास्त्र विषयाची स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. वीस टक्के शाळांना शास्त्र विषयाची स्वतंत्र प्रयोग शाळा उपलब्ध नाही.


विज्ञान विषयातील लहान-मोठे प्रयोग करण्यासाठी प्रत्येक शाळेत विज्ञान विषयाची प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे.

सारणीशी सुसंगती साधण्यासाठी आलेख
आतील बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक ५.१८
## विद्यालयामध्ये ग्रंथालयाची उपलब्धता




## आलेख क्रमांक ५.१९
## ग्रंथालयातील संदर्भग्रंथाची पर्याप्तता



## सारणी क्रमांक - ५.५६

## विद्यालयामध्ये ग्रंथालयांची सोय

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १९ | ७६ |
| २ | नाही | ६ | २४ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५६ वरून असे निदर्शनास येते की, ७६ टक्के शाळांना स्वतंत्र ग्रंथालय आहे तर २४ टक्के शाळांना स्वतंत्र ग्रंथालय नाही.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी तसेच शिक्षकांना वेळोवेळी संदर्भ ग्रंथांची आवश्यकता असते त्यासाठी विद्यालयामध्ये स्वतंत्र ग्रंथालय असणे आवश्यक आहे.

ग्रंथालयात पुरेसे संदर्भ ग्रंथ आहेत का ते सारणी क्रमांक ५.५७ मध्ये दिले आहे.

## सारणी क्रमांक - ५.५७

## ग्रंथालयातील संदर्भग्रंथांची पर्याप्तता


| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १८ | ७२ |
| २ | नाही | ७ | २८ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५७ वरून असे निदर्शनास येते की, ७२ टक्के शाळांमध्ये पुरेसे संदर्भ ग्रंथ आहेत, तर २८ टक्के शाळांमध्ये पुरेसे संदर्भ ग्रंथ नाहीत.

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी ग्रंथालयामध्ये पुरेसे संदर्भ ग्रंथ आवश्यक आहेत. त्यासाठी प्रत्येक शाळांतील मुख्याध्यापकांनी जागृत असणे आवश्यक आहे.

आलेख क्रमांक ५.२०

मूल्यशिक्षण हस्तपुस्तिकांची उपलब्धता



## सारणी क्रमांक - ५.५८

## मूल्यशिक्षण हस्तपुस्तिकांची उपलब्धता

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १७ | ६८ |
| २ | नाही | ८ | ३२ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५८ वरून असे निदर्शनास येते की, ६८ टक्के शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी व ९ वी, १० वी च्या मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत, तर ३२ टक्के शाळांमध्ये हस्तपुस्तिका उपलब्ध नाहीत.

मूल्यशिक्षणाचे स्थूलमानाने स्वरूप समजावून घेण्यासाठी मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका उपयोगी आहेत. हस्तपुस्तिका शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरतात, त्यामुळे ३२ टक्के शाळांनीसुद्धा हस्तपुस्तिका संग्रही ठेवाव्यात असे संशोधकास वाटते.

## सारणी क्रमांक - ५.५९


## ग्रंथालयातील ग्रंथ प्रकारानुसार संख्या

| अ.क्र | विद्यालयाचे नांव | चरित्रे | आत्म-चरित्र | सुभाषित संग्रह | मासिके | साप्ताहिके व वर्तमानपत्रे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सदाशिवराव माने विद्यालय अकलूज | २७० | ४० | १२ | ०७ | १२ | ३४१ |
| २ | महर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रशाला शंकरनगर | २५० | २० | ०९ | ०२ | १० | २९१ |
| ३ | कन्या प्रशाला शंकरनगर | ५० | १० | ०७ | ०३ | ०७ | ७७ |
| ४ | कृष्णानंद विद्यामंदीर पाटील वस्ती | ५० | १० | ०५ | ०३ | ०८ | ७६ |
| ५ | सादाशिवराव माने विद्यालय माणकी | १० | ०५ | ०२ | ०४ | ०७ | २८ |
| ६ | मोरोची विद्यालय मोरोची | २५० | १०० | १० | ०२ | ०७ | २५९ |
| ७ | कन्या प्रशाला अकलूज | १० | १० | १० | १० | ०८ | ४८ |
| ८ | श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील कन्या प्रशाला नातेपुते | १२ | १३ | १० | ०५ | ०३ | ४३ |
| ९ | श्रीगणेश विद्यालय पिंपळनेर | ५० | १३ | ०७ | ०४ | ०३ | ७७ |
| १० | प्रतापसिंह मोहिते पाटील विद्यालय शिवपुरी | ४० | १५ | १० | ०३ | ०२ | ७० |
| ११ | माध्यमिक विद्यालय गुरसाळे | ३० | ०७ | ०२ | ०२ | ०३ | ४४ |
| १२ | श्री विजयसिंह मोहिते विद्यालय वाघोली | २५ | ०८ | ०५ | ०३ | ०८ | ४९ |
| १३ | श्री विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय विजोरी | १० | १२ | ०३ | ०२ | ०५ | ३२ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | माध्यमिक विद्यालय चाकोरे | १० | १५ | ०३ | ०७ | ०५ | ४० |
| १५ | मोहनराव पाटील विद्यालय बोरगांव | १५ | १० | ०३ | १२ | ०३ | ५३ |
| १६ | श्री. जयसिह मोहिते पाटील विद्यालय गारवाड | ०५ | | | ०१ | ०५ | १२ |
| १७ | माध्यमिक विद्यालय पळसमंडळ | | | | | | |
| १८ | श्री. विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय कोळेगांव | ४० | ०५ | ०३ | | ०५ | ५३ |
| १९ | माध्यमिक विद्यालय बोंडले | १२५ | ४१ | ०२ | | ०३ | १७९ |
| २० | माध्यमिक विद्यालय उंबरे दहीगांव | | | | | | |
| २१ | श्री. बाणलिंग विद्यालय फोंडशिरस | ०५ | १० | ०२ | ०२ | ०४ | २३ |
| २२ | रामलिंग विद्यालय कुरबावी | | | | | | |
| २३ | श्रीमती. रत्नप्रभादेवी मोहिते पाटील प्रशाला मांडवे | ०८ | १० | ०१ | ०५ | | २४ |
| २४ | सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर | १२ | | ०३ | ०२ | ०३ | २० |
| २५ | माध्यमिक विद्यालय लवंग | १५ | १० | ०८ | ०२ | ०४ | ३९ |
| | एकूण | १२९२ | ३६४ | १३७ | ८१ | ११५ | १९८९ |
| | शेकडा प्रमाण | ६५ | १८ | ७ | ४ | ६ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.५९ वरून असे निदर्शनास येते की, मूल्यशिक्षण कार्यवाही करण्यासाठी किमान ग्रंथ प्रकारामध्ये चरित्रे, आत्मचरित्रे, सुभाषित संग्रह, मासिके, साप्तहिके, वृत्तपत्र यांचा समावेश होतो. संस्थेतील २५ शाळांमध्ये चरित्र या ग्रंथाचे प्रमाण १८ आहे. हे प्रमाण खूप कमी आहे. सुभाषित संग्रह, मासिके, साप्ताहिके व वृत्तपत्रे यांचे सरासरी प्रमाण १७ टक्के एवढे आहे व हे प्रमाण सुद्धा अल्प आहे.

आलेख क्रमांक ५.२१
ग्रंथालयातील संदर्भ साहित्याच्या वापराचे नियोजन



साप्ताहिके व वर्तमानपत्रे यांचे प्रमाण ६ टक्के आहे. हे प्रमाण कमी असले तरी सुद्धा एकूण संख्येच्या तुलनेत हे प्रमाण कमीच असणार आहे कारण वर्तमानपत्रे व मासिके खरेदी करण्यास शेवटी मर्यादा पडतात.

## सारणी क्रमांक - ५.६०

## ग्रंथालयातील संदर्भ साहित्याच्या वापराच्या नियोजनबाबत

| अनुक्रमांक | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १४ | ५६ |
| २ | नाही | ११ | ४४ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.६० वरून असे निदर्शनास येते की, ५६ टक्के शाळांमध्ये संदर्भ साहित्य वाटपाचे नियोजन केले जाते तर ४४ टक्के शाळांमध्ये त्याचे कोणत्याही प्रकारे नियोजन केले जात नाही.

ग्रंथालयाचा वापर सुयोग्य पद्धतीने घडवून येण्यासाठी शालेय ग्रंथालयाचे नियोजन योग्य पद्धतीने होणे गरजेचे आहे.

## सारणी क्रमांक - ५.६१

## ग्रंथालयाच्या नियोजनाचे स्वरूप

| अनुक्रमांक | नियोजनाचे स्वरूप | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षक व विद्यार्थांना स्वतंत्र वेळ देणे | १० | ४० |
| २ | पुस्तकांची डिमांड घेऊन | ४ | १६ |
| ३ | अनुत्तरित | ११ | ४४ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की ४० टक्के मख्याध्यापक ग्रंथालयाचे नियोजन करताना शिक्षक व विद्यार्थी यांना स्वतंत्र वेळ देतात ही बाब समाधानकारक आहे. सोळा टक्के मुख्याध्यापक हे पुस्तकांची डिमांड घेऊन ग्रंतालय प्रमुख (ग्रंथपाल) पुस्तकांची सोय करतात तर, ४४ टक्के मुख्याध्यापक कोणत्याही प्रकारचे नियोजन करत नाहीत असे दिसते ही बाब समाधानकारक नाही कारण ग्रंथ असुनसुद्धा त्याचा वापर योग्य प्रकारे होऊ शकत नाही.

## ५.०९ मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीवर परिणाम करणारे घटक

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ३० ते ३६ प्रश्न हे मूल्यशिक्षण कार्यवाही बाबत विचारले होते. त्यामध्ये बद्ध प्रश्न चार व मुक्त प्रश्न दोन होते. त्या प्रश्नांचे वर्गीकरण खालील प्रमाणे केले आहे.

## सारणी क्रमांक - ५.६२

## मूल्यशिक्षणाची कार्यवाही करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रमांक | नियोजनाचे स्वरूप | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | संदर्भ ग्रंथांचा अभाव | १३ | ५२ |
| २ | शैक्षणिक साधनांचा अभाव | २० | ८० |
| ३ | अपूरा कालावधी | ०८ | ३२ |

वरील सारणी क्रमांक ५.६२ वरून असे निदर्शनास येते की, ५२ टक्के शाळांना संदर्भ ग्रंथांचा अभाव ही अडचण प्रामुख्याने जाणवते, तर ८० टक्के शाळांना शैक्षणिक साधनांचा अभाव ही अडचण जाणवते. बत्तीस टक्के शाळांना मूल्यशिक्षणासाठी कालावधी अपूरा आहे असे वाटते.

बावन्न टक्के शाळांना संदर्भ ग्रंथांची अडचण जाणवते. मुख्याध्यापकांनी संस्थेशी चर्चा करून ग्रंथालय समृद्ध करणे आवश्यक आहे, त्यामुळे ही अडचण सुटू शकते. ऐंशी टक्के शाळांना शैक्षणिक साधनांची

अडचण जाणवते. ही अडचण सोडविण्यासाठी शिक्षकांशी चर्चा करणे, शिक्षक पालक सभांचे आयोजन करावे व त्यांमधून ही समस्या सुटू शकेल.

वरील सारणीमध्ये शेकडा प्रमाण १०० टक्के पेक्षा जास्त येण्याचे कारण म्हणजे काही शाळांना एक पेक्षा अधिक अडचणी जाणवतात.

## सारणी क्रमांक - ५.६३

## मूल्यशिक्षणावर परिणाम करणारे घटक

| अनुक्रमांक | परिणाम करणारे घटक | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांची अमर्याद संख्या | १० | ४० |
| २ | कालबाह्य अभ्यासक्रम | ०४ | १६ |
| ३ | राजकीय धोरणाचे शिक्षणावर प्रभुत्व | ०६ | २४ |
| ४ | महागडे शिक्षण | १२ | ४८ |
| ५ | अस्थिर कौटुंबिक परिस्थिती | १० | ४० |
| ६ | कालबाह्य अध्यापन पद्धती | ०२ | ०८ |

वरील सारणी क्रमांक ५.६३ वरून असे निदर्शनास येते की, ४० टक्के मुख्याध्यापकांना विद्यार्थांची अमर्याद संख्या मुल्यशिक्षणावर परिणाम करते असे वाटते.सोळा टक्के मुख्याध्यापकांना अभ्यासक्रम कालबाह्य आहे असे वाटते. चोवीस टक्के मुख्याध्यापकांना राजकीय धोरणाचे शिक्षणावर प्रभुत्व आहे असे वाटते. चाळीस टक्के मुख्याध्यापकांना अस्थिर कौटुंबीक परिस्थिती मूल्यशिक्षणावरती परिणाम करते असे वाटते. वरील सारणीमध्ये शेकडा प्रमाण १०० टक्के पेक्षा अधिक येते त्याचे मुख्य कारण म्हणजे काही शाळांच्या मुख्यध्यापकांनी एक पेक्षा अधिक प्रतिसाद दिलेले आहेत.

वर्गात विद्यार्थी संख्या मर्यादित असेल तर वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देणे शक्य असते त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये नाते निर्माण होऊ शकते. आजची शिक्षण पद्धती महागडी आहे असे ४८ टक्के मुख्याध्यापकांना वाटते पण शासनाच्या विविध योजनांचा योग्य पद्धतीने वापर केल्यास हे म्हणणे

तितकेसे योग्य वाटत नाही. विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा समर्पकपणे वापर करणे आवश्यक आहे.

## सारणी क्रमांक - ५.६४

## मूल्यशिक्षणावर परिणाम करणाऱ्या घटकांवर उपाययोजना

| अनुक्रमांक | उपाययोजनांचे स्वरूप | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्गात विद्यार्थी संख्या नियंत्रित असावी. | ९ | ३६ |
| २ | शैक्षणिक सवलती वाढवाव्यात. | १० | ४० |
| ३ | अभ्यासक्रम पुर्नरचना करावी. | ७ | २८ |
| ४ | पालकांना आर्थिक दर्जा सुधारणे | २ | ०८ |
| ५ | अनुत्तरीत | ५ | २० |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, ३६ टक्के मुख्याध्यापकांना विद्यार्थी संख्या नियंत्रित असावी असे वाटते. चाळीस टक्के मुख्याध्यापकांना शैक्षणिक सुवीधा वाढवाव्यात असे वाटते. अठ्ठावीस टक्के मुख्याध्यापकांना अभ्यासक्रमाची पुर्नरचना करावी असे वाटते.आठ टक्के मुख्याध्यापकांना पालकांची आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक आहे असे वाटते. वीस टक्के मुख्याध्यापकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

वर्गात विद्यार्थी संख्या नियंत्रित असणे हा प्रतिसाद योग्य वाटतो कारण मूल्यसंक्रमण व्यवस्थित होण्यासाठी विद्यार्थी संख्या नियंत्रित असणे आवश्यक आहे. पालकांचा आर्थिक दर्जा सुधारणे यासाठी आठ टक्के मुख्याध्यापकांनी प्रतिसाद नोंदविला आहे. पालकांचा आर्थिक दर्जा सुधारण्यास विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

## सारणी क्रमांक - ५.६५

## मूल्यसंक्रमणाचे प्रमाण

| अनुक्रमांक | मूल्यांचे नावे | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | श्रमप्रतिष्ठा | २२ | ८८ |
| २ | राष्ट्रभक्ती | २२ | ८८ |
| ३ | स्त्री-पुरूष समानता | १९ | ७६ |
| ४ | सर्वधर्मसहिष्णुता | २० | ८० |
| ५ | राष्ट्रीय एकात्मता | २२ | ८८ |
| ६ | वैज्ञानिक दृष्टिकोन | १९ | ७६ |
| ७ | संवेदनशीलता | १३ | ५२ |
| ८ | सौजन्यशीलता | १४ | ५६ |
| ९ | वक्तशीरपणा | २१ | ८४ |
| १० | निटनेटकेपणा | २३ | ९२ |

वरील सारणी क्रमांक ५.६५ वरून असे निदर्शनास येते की, श्रमप्रतिष्ठा ८८ टक्के, राष्ट्रभक्ती ८८ टक्के, स्त्री-पुरूष समानता ७६ टक्के, सर्वधर्मसहिष्णुता ८० टक्के, राष्ट्रीय एकात्मता ८८ टक्के, वैज्ञानिक दृष्टिकोन ७६ टक्के, संवेदनशीलता ५२ टक्के, सौजन्यशीलता ५६ टक्के ,वक्तशीरपणा ८४ टक्के, निटनेटकेपणा यासाठी ९२ टक्के प्रतिसाद मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे.

वरील सारणी वरून वेगवेगळ्या मूल्यासाठी कमी अधिक प्रतिसाद नोंदविला आहे. ही मूल्ये शालेय वातावरणात फक्त रूजली जातील असे गृहित धरने चुकीचे आहे. या मूल्यांवरती शालेय वातावरणाबरोबर इतरही घटक परिणाम करतात त्यामुळे शालेय वातावरणात ही मूल्ये १०० टक्के संक्रमीत होणार नाहीत त्यासाठी खूप कालावधी लागणार आहे असे संशोधकास वाटते.

जी मूल्ये रूजविली जाणार नाहीत त्याची कारणे कोणती ते सारणी क्रमांक ५.५६ मध्ये दिले आहे.

## सारणी क्रमांक ५.६६

## मूल्ये संक्रमीत होण्यापाठीमागील कारणे.

| अनुक्रमांक | मूल्ये रूजली न जाण्याची कारणे | एकूण प्रतिसादक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वेळ अपूरा पडतो. | ८ | ३२ |
| २ | योग्य मार्गदर्शनाचा अभाव | ७ | २८ |
| ३ | सामाजिक परिवर्तन घडून येत नाही | ८ | ३२ |
| ४ | शाळाबाह्य प्रयत्न होत नाहीत. | ६ | २४ |
| ५ | अनुत्तरीत | ९ | ३६ |

वरील सारणी क्रमांक ५.६६ वरून असे निदर्शनास येते की, ३२ टक्के मुख्याध्यापकांना मूल्ये रूजविण्यासाठी वेळ अपुरा वाटतो, २८ टक्के मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही असे वाटते. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना सामाजिक परिवर्तन घडून येत नाही असे वाटते. उदा. अंधश्रद्धा, मुलगाच हवा. चोवीस टक्के मुख्याध्यापकांना शालाबाह्य प्रयत्न घडून येत नाही असे वाटते, तर ३६ टक्के मुख्याध्यापकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

वेळ अपुरा वाटतो असा प्रतिसाद ३२ टक्के मुख्याध्यापकांनी नोंदविला आहे, पण वेळेचे व्यवस्थितपणे नियोजन केल्यास अशा प्रकारची समस्या जाणवणार नाही असे वाटते. विद्यार्थ्यांच्या समोर शिक्षकांनी चांगल्या प्रकारचे आदर्श ठेवल्यास विद्यार्थ्यांना निश्चित चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन मिळू शकेल. चोवीस टक्के मुख्याध्यापकांना शाळाबाह्य प्रयत्न होत नाही असे वाटते, ही गोष्ट सत्य आहे पण त्यासाठी पालकांमध्ये जागृती करणे ही शाळांची मुख्य जबाबदारी आहे कारण शाळा ही समाजाची एक वाहिनी आहे.

## सारणी क्रमांक - ५.६७

## मूल्यशिक्षणामूळे एस. एस. सी. परीक्षेवर होणारा परिणाम

| अनुक्रमांक | परीक्षेवर होणारा परिणाम | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | टक्केवारी वाढेल. | १२ | ४८ |
| २ | टक्केवारी कमी होईल. | -- | -- |
| ३ | काहीच फरक पडणार नाही. | १३ | ५२ |
| | | २५ | १०० |

वरील सारणी क्रमांक ५.६७ वरून असे निदर्शनास येते की, ४८ टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षणामध्ये एस. एस. सी. परीक्षेचा निकाल वाढेल असे वाटते. बावन्न टक्के मुख्याध्यापकांना निकालावर कोणताही परिणाम होणार नाही असे वाटते.

मूल्यसंक्रमण सुव्यवस्थितपणे झाल्यास विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण निश्चित प्रमाणात वाढेल.